श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## उद्धव गीता (11.25)



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्री कृष्ण तैयार।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥**

**एकादशः स्कंधः**

**॥ अथ पञ्चविंशोऽध्यायः ॥**

**श्रीभगवानुवाच**

**गुणानामसमिश्राणां(म्), पुमान् येन यथा भवेत् ।**
**तन्मे पुरुषवर्येद- मुपधारय शं(म्)सतः ॥ 1॥**

भगवान श्रीकृष्ण म्हणतात -हे पुरुष श्रेष्ठ !कोणत्या गुणामुळे माणसाचा स्वभाव कसा बनतो 'हे मी तुला सांगतो .लक्ष देऊन ऐक.

**शमो दमस्तितिक्षेक्षा, तपः(स्) सत्यं(न्) दया स्मृतिः ।**
**तुष्टिस्त्यागोऽस्पृहा श्रद्धा, ह्रीर्दयादिः(स्) स्वनिर्वृतिः ॥ 2॥**

मन संयम ,इंद्रिय निग्रह ,सहिष्णुता ,विवेक ,तप,सत्य,दया ,स्मृति ,संतोष ,त्याग ,विषय -उपभोगांबद्दल अनिच्छा ,श्रद्धा ,लज्जा ,आत्मरती ,दान ,विनय ,सरलता इत्यादी सत्वगुणाच्या वृत्ती होत .

**काम ईहा मदस्तृष्णा, स्तम्भ आशीर्भिदा सुखम् ।**

मदोत्साहो यशः(फ्) प्रीतिर्- हास्यं वीर्यं(म्) बलोद्यमः ॥ 3॥

इच्छा ,प्रयत्न ,गर्व ,लोभ,अपेक्षा , भेदबुद्धी ,विषय भोग ,युद्ध इत्यादींसाठी गर्वयुक्त उत्साह ,आपल्या यशावर प्रेम ,हास्य,पराक्रम ,हट्टाने उद्योग करणे इत्यादी रज गुणाच्या वृत्ती होत .

क्रोधो लोभोऽनृतं(म्) हिं(म्)सा, याच्ञा दम्भः(ख्) क्लमः(ख्) कलिः ।

शोकमोहौ विषादार्ती, निद्राऽऽशा भीरनुद्यमः ॥ 4॥

क्रोध ,लोभ,मिथ्या भाषण ,हिंसा ,याचना ,पाखंड , श्रम ,भांडण,शोक ,मोह ,विशा द , दीन ता ,निद्रा ,आशा ,भय ,आळस इत्यादी तमोगुणीच्या वृत्ती होत .

सत्त्वस्य रजसश्चैतास्- तमसश्चानुपूर्वशः।

वृत्तयो वर्णितप्रायाः(स्), सन्निपातमथो शृणु ॥ 5॥

अशाप्रकारे मी सत्वगुण ,रजोगुण आणि यांच्या बहुतेक कृतींचे वर्णन केले आहे .आता त्यांच्या मिश्रणाने ज्या वृत्ती निर्माण होतात ,त्यांचे वर्णन ऐक.

सन्निपातस्त्वहमिति, ममेत्युद्धव या मतिः ।

व्यवहारः(स्) सन्निपातो, मनोमात्रेन्द्रियासुभिः ॥ 6॥

उद्धवा !तीन गुणांच्या मिश्रणाने मी आणि माझे या प्रकारचे बुद्धी उत्पन्न होते . मन ,शब्दा दी विषय ,इंद्रिय आणि प्राण यांच्या योगाने वृत्तींचा व्यवहार होतो .

धर्मे चार्थे च कामे च, यदासौ परिनिष्ठितः ।

गुणानां(म्) सन्निकर्षोऽयं(म्), श्रद्धारतिधनावहः ॥ 7॥

जेव्हा मनुष्य धर्म अर्थ आणि काम हे पुरुषार्थ साध्य करण्यात तत्पर असतो ,तेव्हा त्याला सत्वगुणापासून श्रद्धा ,तमोग्रापासून धन आणि रजोगुणापासून प्रेम यांची प्राप्ती होते . हेही गुणांचेच मिश्रण होय .

प्रवृत्तिलक्षणे निष्ठा, पुमान् यर्हि गृहाश्रमे ।

स्वधर्मे चानुतिष्ठेत, गुणानां(म्) समितिर्हि सा ॥ 8॥

जेव्हा माणूस सकाम कामा किंवा गृहस्थाश्रमात किंवा स्वधर्म पालनात निष्ठा ठेवून ति ती कामे करतो त्यावेळी सुद्धा त्याचे ठिकाणी गुणांचे मिश्रण आहे , असे समजावे .

पुरुषं(म्) सत्त्वसं(यँ)युक्त- मनुमीयाच्छमादिभिः।

कामादिभी रजोयुक्तं(ङ्), क्रोधाद्यैस्तमसा युतम् ॥ 9॥

माणसाच्या ठिकाणी शम - दमादीगुणांवरून सत्वगुण ,कामा दी प्रवृत्तींवरून रजो गुण आणि काम क्रोध इत्यादींवरून तमोगुन प्रबल आहे ,असे समजावे .

**यदा भजति मां(म्) भक्त्या, निरपेक्षः(स्) स्वकर्मभिः ।**

**तं(म्) सत्त्वप्रकृतिं(वँ) विद्यात्, पुरुषं(म्) स्त्रियमेव वा ॥ 10॥**

पुरुष असो की स्त्री ,जेव्हा निष्काम भावनेने आपल्या नित्य नैमित्तिक कर्माने माझे आराधना करते ,तेव्हा ती व्यक्ती सत्वगुणी समजावी .

**यदा आशिष आशास्य,मां(म्) भजेत स्वकर्मभिः ।**

**तं(म्) रजः(फ्)प्रकृतिं(वँ) विद्याद्- धिं(म्)सामाशास्य तामसम्॥ 11॥**

सकाम भावनेने आपल्या कर्मांनी माझे भजन पूजन करणारा रजोगुणी होय .आणि जो शत्रुनाश इत्यादींसाठी माझे पूजन करतो ,तो तमोगुणी समजावा .

**सत्त्वं(म्) रजस्तम इति, गुणा जीवस्य नैव मे ।**

**चित्तजा यैस्तु भूतानां(म्), सज्जमानो निबध्यते ॥ 12॥**

सत्व ,रज ,तम हे तीन गुण जीवाचे आहेत ,माझे -परमात्म्याचे नव्हेत .हे प्राण्यांच्या चित्तामध्ये उत्पन्न होतात .त्यामध्ये आसक्त झाल्याने जीव संसार बंधनात बांधला जातो .

**यदेतरौ जयेत्सत्त्वं(म्), भास्वरं(वँ) विशदं(म्) शिवम् ।**

**तदा सुखेन युज्येत, धर्मज्ञानादिभिः(फ्) पुमान् ॥ 13॥**

सत्वगुण हा प्रकाशदायी निर्मल आणि शांत आहे .तो जेव्हा गुण आणि तमोगुणी यांचा पराभव करून वाढतो 'तेव्हा पुरुष सुख ,धर्म ,ज्ञान इत्यादी युक्त होतो .

**यदा जयेत्तमः(स्) सत्त्वं(म्), रजः(स्) सं(ङ्) गं(म्) भिदा चलम् ।**

**तदा दुःखेन युज्येत, कर्मणा यशसा श्रिया ॥ 14॥**

रजू गुण भेद बुद्धीला कारणीभूत आहे .आसक्ती आणि प्रवृत्ती हा त्याचा स्वभाव आहे .तेव्हा तमोगुना आणि सत्वगुणी यांच्यावर मात करून रजो गुण वाढतो .तेव्हा मनुष्य दुःख कर्म यश आणि आर्थिक संपन्नता यांनी युक्त होतो .

**यदा जयेद् रजः(स्) सत्त्वं(न्) तमो मूढं(लँ) लयं(ञ्)जडम् ।**

**युज्येत शोकमोहाभ्यां(न्),निद्रया हिं(म्)सयाऽऽशया॥ 15॥**

अज्ञान हे समगुनाचे स्वरूप आहे .आळस आणि बुद्धीची मूढता हे त्याचे स्वभाव होत .जेव्हा तो वाढून सत्वगुण आणि रज गुणाला मागे टाकतो .तेव्हा माणूस आकांक्षा शोक मोह हिंसा निद्रा आळस यांना वश होतो .

**यदा चित्तं(म्) प्रसीदेत, इन्द्रियाणां(ञ्) च निर्वृतिः ।**

**देहेऽभयं(म्) मनोऽसं(ङ्)गं(न्), तत् सत्त्वं(वँ) विद्धि मत्पदम् ॥ 16॥**

जेव्हा चित्त प्रसन्न असते ,इंद्रिय शांत असतात ,देह निर्भय असतो आणि मनामध्ये आसक्ती नसते ,तेव्हा सत्वगुण वाढलेला आहे असे समजावे .माझ्या प्राप्तीचे सत्वगुण हे साधन आहे .

**विकुर्वन् क्रियया चाधी- रर्निवृत्तिश्च चेतसाम् ।**

**गात्रास्वास्थ्यं(म्) मनो भ्रान्तं(म्), रज एतैर्निशामय ॥ 17॥**

जेव्हा कर्म करीत असताना जीवाशी बुद्धी चंचल ,ज्ञानेन्द्रिय असंतुष्ट ,कर्मेंद्रिय अस्वस्थ आणि मन भ्रांत होते ,तेव्हा रजू गुणाचा जोर वाढला आहे असे समजावे .

**सीदच्चित्तं(वँ) विलीयेत, चेतसो ग्रहणेऽक्षमम् ।**

**मनो नष्टं(न्) तमो ग्लानिस्-तमस्तदुपधारय॥ 18॥**

चित्त जेव्हा ज्ञानेंद्रियांच्या द्वारा शब्द इत्यादी विषय योग्य रीतीने समजण्यास असमर्थ ठरेल आणि खिन्न होऊन निराश होईल ,मन सुन्न होईल ,तसेच अज्ञान आणि खेद यांची वाढ होईल ,तेव्हा समोर वाढला आहे असे समजावे .

**एधमाने गुणे सत्त्वे, देवानां(म्) बलमेधते ।**

**असुराणां(ञ्) च रजसि, तमस्युद्धव रक्षसाम् ॥ 19॥**

उद्धवा ! सत्वगुण वाढल्यावर देवतांचे ,रजू गुण वाढल्यावर असूरांचे आणि तमोगुण वाढल्यावर राक्षसांचे बळ वाढते . (वृत्तींमध्ये सुद्धा अनुक्रमे सत्व इत्यादी गुण वाढल्यावर देवत्व 'असुरत व आणि राक्षसत्व - प्रधान ,निवृत्ती ,प्रवृत्ती किंवा मोह यांचे प्राबल्य दिसून येते .

**सत्त्वाज्जागरणं(वँ) विद्याद् रजसा स्वप्नमादिशेत् ।**

**प्रस्वापं(न्) तमसा जन्तोस्- तुरीयं(न्) त्रिषु सन्ततम् ॥ 20॥**

सत्वगुणामुळे जागृती ,र जो गुणामुळे स्वप्न ,आणि तमोगुनावणे सुषुप्ती असते .असे समजावे . सूर्य अवस्था आत्मरूप असल्याने त्या तिन मध्ये साक्षीत्वाने एकरूप होऊन व्याप्त असते .

**उपर्युपरि गच्छन्ति, सत्त्वेन ब्राह्मणा जनाः ।**

**तमसाधोऽध आमुख्याद्, रजसान्तरचारिणः॥ 21॥**

वेदा अभ्यासामध्ये तत्पर असणारे ब्राह्मण सत्वगुणाच्याद्वारे उत्तरोत्तर वर्षा लोकांमध्ये जातात. तमोगुनामुळे जीवांना वृक्ष इत्यादी पर्यंतची अधोगती प्राप्त होते आणि र जोगुणामुळे मनुष्य शरीर प्राप्त होते .

**सत्त्वे प्रलीनाः(स्) स्वर्यान्ति, नरलोकं(म्) रजोलयाः ।**

**तमोलयास्तु निरयं(यँ), यान्ति मामेव निर्गुणाः ॥ 22॥**

सत्वगुणाच्या वृद्धीत मृत्यू आला असता स्वर्गाची प्राप्ती होते , रजो गुणाच्या वृद्धीत मृत्यू आले ल्याला मनुष्य लोक मिळतो आणि तमोगुनाची वृद्धी असताना ज्याला मृत्यू येतो ,त्याला नरकाची प्राप्ती होते .परंतु जे त्रिगुणा ति त असतात ,त्यांना माझीच प्राप्ती होते .

**मदर्पणं(न्) निष्फलं(वँ) वा, सात्त्विकं(न्) निजकर्म तत् ।**

**राजसं(म्) फलसं(ङ्)कल्पं(म्), हिं(म्)साप्रायादि तामसम् ॥ 23॥**

जेव्हा आपल्या धर्मानुसार केलेले कर्म निष्काम किंवा मला समर्पित केले जाते ,तेव्हा ते सात्विक होते .ज्या कर्माच्या अनुष्ठानामध्ये एखाद्या फळाची अपेक्षा असते ,तेव्हा ते राजस होते आणि कर्म करण्यात एखाद्याला त्रास देणे इत्यादी भाव असतो ,तेव्हा ते तामसिक होते

**कैवल्यं(म्) सात्त्विकं(ञ्) ज्ञानं(म्), रजो वैकल्पिकं(ञ्) च यत् ।**

**प्राकृतं(न्) तामसं(ञ्) ज्ञानं(म्), मन्निष्ठं(न्) निर्गुणं(म्) स्मृतम् ॥ 24॥**

एकमेव द्वितीय आत्म्याचे ज्ञान हे सात्विक ज्ञान होय .देहयुक्त आत्मा करता भोक्ता आहे असे समजणे ,हे राज स सर ज्ञान आहे .आणि केवळ शरीरालाच आत्मा मानणे ,हे तामसज्ञान आहे आणि गुणातीत ज्ञान हे माझ्या स्वरूपाचे खरे ज्ञान होय .

**वनं(न्) तु सात्त्विको वासो, ग्रामो राजस उच्यते ।**

**तामसं(न्) द्यूतसदनं(म्), मन्निकेतं(न्) तु निर्गुणम् ॥ 25॥**

वनात राहणे हा सात्विक निवास आहे .गावामध्ये राहणे राजस आहे आणि जुगार इत्यादी चालणाऱ्या घरात राहणे हा तामस आहे आणि माझ्या मंदिरात राहणे हा निर्गुण निवास आहे .

**सात्त्विकः(ख्) कारकोऽसं(ङ्)गी, रागान्धो राजसः(स्) स्मृतः ।**

**तामसः(स्) स्मृतिविभ्रष्टो, निर्गुणो मदपाश्रयः ॥ 26॥**

अनासक्त भावाने कर्म करणारा सात्विक होय .अत्यंत आसक्त होऊन कर्म करणारा राजस होय .कोणताही विचार न करता कर्म करणारा तामस होय आणि फक्त मलाच शरण येऊन कर्म करणारा निर्गुण समजावा .

सात्त्विक्याध्यात्मिकी श्रद्धा, कर्मश्रद्धा तु राजसी ।

तामस्यधर्मे या श्रद्धा, मत्सेवायां(न्) तु निर्गुणा ॥ 27॥

आत्मज्ञान विषयक श्रद्धा सात्विक ,कर्मविषयक श्रद्धा राजस ,अधर्माच्या ठिकाणी श्रद्धा तामस आणि माझी सेवा करण्यामध्ये श्रद्धा ही निर्गुण होय .

पथ्यं(म्) पूतमनायस्त- माहार्यं(म्) सात्त्विकं(म्) स्मृतम् ।

राजसं(ञ्) चेन्द्रियप्रेष्ठं(न्), तामसं(ञ्) चार्तिदा शुचि ॥ 28॥

आरोग्यदायी पवित्र आणि अनाया असे मिळालेले भोजन सात्विक होय .जिभेला रुचकर वाटणारे अन्न राजस होय आणि दुःखदायी व अपवित्र आहार तामस जाणावा .

सात्त्विकं(म्) सुखमात्मोत्थं(वँ), विषयोत्थं(न्) तु राजसम् ।

तामसं(म्) मोहदैन्योत्थं(न्), निर्गुणं(म्) मदपाश्रयम् ॥ 29॥

आत्मचिंतनाने प्राप्त होणारे सुख सात्विक ,विषयांपासून प्राप्त होणारे राजस ,मोह आणि दिनतेने प्राप्त होणारे सुख तामस आणि जे सुख माझ्या आश्रयाने मिळणारे ते गुणातीत समजावे .

द्रव्यं(न्) देशः(फ्) फलं(ङ्) कालो, ज्ञानं(ङ्) कर्म च कारकः ।

श्रद्धावस्थाकृतिर्निष्ठा, त्रैगुण्यः(स्) सर्व एव हि ॥ 30॥

वस्तू , स्थान , फल , काल , ज्ञान , कर्म , कर्ता , श्रद्धा , अवस्था निरनिराळी शरीर है आणि निष्ठा हे सर्व त्रिगुणात्मकच आहे .

सर्वे गुणमया भावाः(फ्), पुरुषाव्यक्तधिष्ठिताः ।

दृष्टं(म्) श्रुतमनुध्यातं(म्), बुद्ध्या वा पुरुषर्षभ ॥ 31॥

हे पुरुष श्रेष्ठा ! पुरुष आणि प्रकृती यांच्या आश्रयाने असणारे सर्व पदार्थ गुण मय आहेत .मग ते इंद्रियांच्या अनुभवाचे असो त ,शास्त्राने सांगितलेले असो त ,अथवा बुद्धीने विचार केलेले असोत .

एताः(स्) सं(म्)सृतयः(फ्) पुं(म्)सो, गुणकर्मनिबन्धनाः ।

येनेमे निर्जिताः(स्) सौम्य, गुणा जीवेन चित्तजाः ।

भक्तियोगेन मन्निष्ठो, मद्भावाय प्रपद्यते ॥ 32॥

जीवाला योनी किंवा गती त्या त्या गुणकारमानुसार मिळतात .हे सौम्य ! जो जीव चित्तात उत्पन्न होणाऱ्या विकारांवर विजय मिळवतो ,तो भक्ती योगाने माझ्या मध्ये निष्ठा ठेवतो आणि त्यामुळे माझे सर्व प्राप्त करून घेतो .

तस्माद् देहमिमं(ल्ँ) लब्ध्वा, ज्ञानविज्ञानसम्भवम् ।

गुणसं(ङ्)गं(वँ) विनिर्धूय, मां(म्) भजन्तु विचक्षणाः ॥ 33॥

म्हणून शहाण्या माणसांनी तत्त्वज्ञानाने साक्षात्कार यांची प्राप्ती करून देणारे हे मनुष्य शरीर मिळाल्यावर गुणांची आसक्ती दूर करून माझेच भजन करावे .

निःसं(ङ्)गो मां(म्) भजेद् विद्वा- नप्रमत्तो जितेन्द्रियः ।

रजस्तमश्चाभिजयेत्, सत्त्वसं(म्)सेवया मुनिः ॥ 34॥

विचारवंताने सावध राहून सत्वगुण अंगीकारून रजगुण आणि विजय मिळवावा .इंद्रियांवर ताबा मिळवावा आणि आसक्ती सोडून माझ्या भजनी लागावे .

सत्त्वं चाभिजयेद्युक्तो, नैरपेक्ष्येण शान्तधीः ।

सम्पद्यते गुणैर्मुक्तो, जीवो जीवं(वँ) विहाय माम् ॥ 35॥

चित्तवृत्ती शांत करून कोणतीही अपेक्षा न ठेवता सत्वगुणावर सुद्धा विजय मिळवावा .अशाप्रकारे गुणांपासून मुक्त होऊन जीव आपला जीवभाव सोडतो आणि माझ्याशी एकरूप होतो .

जीवो जीवविनिर्मुक्तो, गुणैश्चाशयसम्भवैः ।

मयैव ब्रह्मणा पूर्णो, न बहिर्नान्तरश्चरेत् ॥ 36॥

जीव भावातून मुक्त झालेला जीव अंतःकरणात उत्पन्न होणाऱ्या विकारांपासूनही मुक्त होतो आणि ब्रह्म स्वरूप माझ्याशी एकरूप होऊन पूर्ण होतो .मग त्याचे कोठेही येणे जाणे होत नाही .

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म)हितायामेकादशस्कन्धे पञ्चविं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥